**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

**विषय:- दि.०२.०९.२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या ऑनलाईन बैठकीचे इतिवृत्त ..**

**सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते:-**

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.श्री बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग, मा.सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ४ | डॉ. माधुरी कागलकर, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

शिक्षण शुल्क समितीमधील अशासकीय सदस्यांची नियुक्ती प्रतिक्षाधीन असल्याने शिक्षण शुल्क समितीमधील उपरोक्त शासकीय तथा पदसिध्द सदस्यांच्या उपस्थितीत उपरोक्त ऑनलाईन बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीच्या सुरूवातीस सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. त्यामध्ये शिक्षण शुल्क समितीची स्थापना, उद्देश विशद केला. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.१:-राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या सन २०२०-२१ च्या शुल्क निश्चितीबाबत निर्णय घेणे.**

राज्यातील कोविड -१९ च्या पाश्वभूमीवर संपूर्ण देशात मार्च २०२० मध्ये लॉकडाउन लावण्यात आले होते. त्या दिनांकापासून महाविद्यालये बंद आहेत. तसेच कोरोनामुळे पालकांच्या आर्थिक पातळीतही प्रतिकुल परिणाम झाला आहे. तसेच कोरोनामुळे प्रत्यक्ष वर्गात शिक्षण देता आलेले नाही. सदर पार्श्वभूमी विचारात घेता शैक्षणिक सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांना घेता आलेला नाही. त्यामुळे सदर सुविधांवर नेहमीपेक्षा कमी खर्च महाविद्यालयाकडून झाला असण्याची बाब समितीपुढे चर्चेस आली. त्यामुळे होणाऱ्या वेतनेतर खर्चातील बचत शुल्क निश्चित करताना विचारात घेण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त मुद्दयाबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली. तसेच २०२०-२१ चे शिक्षण शुल्क व विकास शुल्क यापूर्वीच महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवर २०१९-२० प्रमाणेच नमूद करून मान्यतेसाठी शिक्षण शुल्क समितीकडे सादर केले होते व त्यास महाडीबीटी पोर्टलवर मान्यताही प्रदान केलेली आहे.

सबब विना अनुदानित व कायम विना अनुदानित (अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळून) शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना शिक्षण शुल्क समितीने दि.०९-०१-२०२० च्या बैठकीत शै.वर्ष २०१९-२० करिता मंजूर केलेले शिक्षण शुल्क व विकास शुल्कच शै.वर्ष २०२०-२१ साठी कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**विषय क्र.२:-शै.वर्ष २०२१-२२ च्या शैक्षणिक शुल्क निर्धारणाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

सन २०२१-२२ साठी महाडीबीटीवर शुल्क निश्चिती करण्याची कार्यवाही नजीकच्या काळात सुरू होणार आहे. आता २०२१-२२ साठी नव्याने प्रस्ताव मागवून त्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून शुल्क निश्चिती करण्यासाठी बराचसा कालावधी लागू शकतो याबाबत समितीत चर्चा झाली व २०२१-२२ चे शुल्क निश्चिती बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. सन २०१९-२० ला ज्या महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यांचेकडून नव्याने प्रस्ताव न मागविता सन २०२०-२१ चे लेखापरिक्षण अहवाल, सदर अहवालाच्या आधारे तयार केलेले परिगणना प्रपत्र आणि एन.सी.टी.ई.ने मंजूर केलेली विद्यार्थी संख्या हे अभिलेख संबंधित महाविद्यालयांकडून तात्काळ मागवून घेवून परिगणना प्रपत्र तयार

करण्यासाठी कार्यवाही विहीत कालमर्यादेत पूर्ण करावी. सदर अभिलेख सादर न केल्यास शिक्षण शुल्क समितीकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखांच्या आधारे शुल्क निश्चितीची कार्यवाही करण्यात येईल, असे महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

२. ज्या महाविद्यालयांनी शै.वर्ष २०१९-२० मध्ये शुल्क निश्चितीचे प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीकडे सादर केलेले नाहीत. त्यांच्याकडून प्रचलित पध्दतीने परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात यावेत. त्यासाठीचे वेळापत्रक निश्चित करण्याची कार्यवाही सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी करावी.

३. जी महाविद्यालये २०२१-२२ मध्ये शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर करणार नाहीत, त्यांची महाडीबीटी पोर्टलवर शुल्क निश्चिती करण्यात येणार नाही. याबाबतची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयांची असेल असे महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

सदस्य तथा सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी शिक्षण शुल्क समितीतील अशासकीय सदस्यांच्या प्रतिक्षाधीन असलेल्या नियुक्त्यांच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा.

सन २०२१-२२ चे प्रस्ताव तपासणीसाठी आवश्यक असलेल्या खर्च लेखापाल (Cost Accountant) यांची विहीत केलेल्या मानधनावर सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी आवश्यकतेनूसार नियुक्ती करावी.

अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर ऑनलाईन बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई